सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattanews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - १०२ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि. २९ मे २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

# १५ जूननंतर मोदींच्या मंत्रिमंडळात फेरबदलाची शक्यता, भाजपा सूत्रांचे संकेत

## राष्ट्रीय स्तरावर पक्षात नव्या चेहऱ्यांना संधी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९ नवी दिल्ली**

भारतीय जनता पार्टीने गुरुवारी चार राज्यात नव्या प्रदेशाध्यक्षांची निवड केली. भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांनी दिल्लीसह पंजाब, हरियाणा आणि त्रिपुराच्या नव्या प्रदेशाध्यक्षांची घोषणा केली. नबीन लवकरच राष्ट्रीयस्तरावरही पक्षात मोठे फेरबदल करण्याची शक्यता आहे. राष्ट्रीय स्तरावर पक्षात नव्या चेहऱ्यांना संधी दिली जाणार आहे, असे वृत्त इंडियन एक्सप्रेसने सूत्रांच्या हवाल्याने प्रसिद्ध केले आहे. यामुळे पक्षाच्या संसदीय मंडळाची पुनर्रचना होऊ शकते आणि हे सरकारमध्ये देखील खांदेपालट होण्याचे संकेत मानले जात आहे.



दिल्लीच्या प्रदेशाध्यक्षपदी ६२ वर्षीय लोकसभा खासदार आणि केंद्रीय मंत्री हर्ष मल्होत्रा यांची नियुक्ती करण्यात आली आहे, तर ७६ वर्षीय केवल सिंग ढिल्लन यांच्याकडे आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पंजाबची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. हरियाणात ५८ वर्षीय अर्चना गुप्ता यांची पक्षाच्या अध्यक्षपदी निवड केली आहे. आणि त्रिपुरामध्ये ४४ वर्षीय अभिषेक देबरॉय यांची प्रदेशाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.नव्याने नियुक्त केलेल्या प्रदेशाध्यक्षांमध्ये मल्होत्रा आणि गुप्ता या दोघांचीही संघटनात्मक पार्श्वभूमी मजबूत आहे. मल्होत्रा हे संघटनात्मक शिस्त असलेले पक्षनेते राहिले आहेत तर, गुप्ता यांची राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची पार्श्वभूमी आहे. दरम्यान, भाजपा राष्ट्रीय स्तरावर पक्षात नव्या चेहऱ्यांना संधी देण्याची शक्यता सूत्रांनी वर्तवली आहे. पंजाबमध्ये पुढील्या वर्षी विधानसभेची निवडणूक होणार आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केवल सिंग ढिल्लन यांची प्रदेशाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. भाजपा या निवडणुकीसाठी जोमाने तयारी करत आहे.

इंडियन एक्सप्रेसच्या वृत्तानुसार, पक्षासह सरकारमध्येही मोठे बदल होण्याची शक्यता आहे. भाजपा नेत्याने एक्सप्रेसला दिलेल्या माहितीनुसार, आर्थिक संकट आणि अनिश्चित जागतिक परिस्थितीच्या वातावरणात सरकार तिसऱ्या वर्षात प्रवेश करणार आहे. यामुळे प्रशासनात नाविन्य आणण्यासाठी आणि पक्षातील काही नेत्यांची नाराजी दूर करण्यासाठी मोठ्या बदलांची मोठी अपेक्षा आहे, असे वृत्तात म्हटले आहे. अधिक मास समाप्त झाल्यानंतर १५ जूननंतर हे बदल होतील अशी शक्यताही सूत्रांनी वर्तवली आहे.

**खांदेपालट होणार?**

युती सरकारच्या दुसरा वर्षानिमित्त पुढच्या महिन्यात दिल्लीत स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला युती सरकारचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री हजेरी लावतील. यावेळी संभाव्य मंत्रिमंडळ बदलावर चर्चा होण्याची शक्यताही भाजपाच्या सूत्रांनी एक्सप्रेसला बोलून दाखवली. जून आणि नोव्हेंबरमध्ये राज्यसभेतील ३४ सदस्य निवृत्त होणार आहेत. या रिक्त जागांसाठी पक्षाकडून होणाऱ्या निवडी मंत्रिमंडळ फेरबदलाशी निगडित असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. एनडीएच्या महिला आरक्षण धोरणावर जोर देण्यासाठी राज्यसभेत तसेच मंत्रिमंडळात महिला नेत्यांचे प्रतिनिधित्व विशेषतः वाढवण्याची चर्चा आहे. तर, मंत्रिमंडळातून बाहेर पडणाऱ्या नेत्यांना राज्यपालपदी सामावून घेतले जाण्याची शक्यता आहे, असे एक्सप्रेसने सूत्राच्या हवाल्याने वृत्त प्रसिद्ध केले आहे.

# पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये विषारी दारूमुळे १३ जणांचा बळी

## आठ लोकांना अटक इतरांचा शोध सुरु

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९पुणे**

पुणे आणि पिंपरी चिंचवडमधे विषारु दारु प्यायल्याने आत्तापर्यंत १३ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे, तर अनेकजण गंभीर आहेत. पिंपरी-चिंचवडमधील दापोडी आणि फुगेवाडी भागात मिळून आठ जणांचा मृत्यू झाला आहे तर पुण्यातील काळे पडळ भागात तीन आणि हडपसर भागात दोन अशा पाच जणांचा मृत्यू झाला आहे. ही विषारी स्पिरिटयुक्त दारु योगेश वानखेडे याने बनवली होती. ती दारु पुणे आणि पिंपरी चिंचवडच्या वेगवेगळ्या भागांमधे मिळून विकली गेली. दापोडी, फुगेवाडी, हडपसर , काळेपडळ भागातील ज्यांनी दारु प्यायली ते तोंडाला फेस येऊन मृत्युमुखी पडले. योगेश वानखेडे हा सराईत दारु विक्रेता असून या आधी अनेक गुन्हे त्याच्यावर नोंद आहेत. त्याला पोलीसांनी अटक केली आहे.



### मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, ही हत्याच

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, माझं पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तांशी बोलणं झालं आहे. ही दारू कुठे तयार झाली, हे देखील पोलिसांनी शोधून काढलं आहे. याप्रकरणातील आरोपींना अटक करण्यात आली आहे. अजून काही लोक असू शकतात, ते शोधण्याचं काम सुरू आहे. जे लोक रूग्णालयात आहेत, त्यांना वाचवण्याचा प्रयत्न सुरू आहे.एकूण घटना अत्यंत गंभीर आहे. आठ लोकांना अटक केली आहे, अजून काही लोकांना अटक केली जाऊ शकते. पूर्ण साखळी शोधून अतिशय कडक कारवाई करण्यात येणार आहे. ही एकप्रकारे हत्याच आहे. आरोपींवर अतिशय कडक कलमे लावण्यात आले आहेत, असे मुख्यमंत्री फडणवीसांनी सांगितलं.




पिंपरी चिंचवड शहरातील दापोडी आणि फुगेवाडी परिसरात गुरुवारी एकाच दिवशी ८ नागरिकांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक माहिती समोर आल्याने संपूर्ण परिसरात घबराट आणि चिंतेचे वातावरण पसरले आहे. धक्कादायक बाब म्हणजे, याच परिसरातील रहिवासी असलेल्या आणखी दोघांवर वेगवेगळ्या रुग्णालयांत उपचार सुरू असून, दोघांचीही प्रकृती अत्यंत चिंताजनक असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली आहे. बंदी असलेली हातभट्टीची गावठी (विषारी) दारू प्यायल्यानेच या नागरिकांचा बळी गेल्याचा आरोप स्थानिक रहिवाशांनी केला आहे. या प्रकरणावरून आता राजकीय वातावरणही तापले असून, अशा अवैध धंद्यांकडे दुर्लक्ष करणाऱ्या पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या कार्यपद्धतीवर तीव्र संताप व्यक्त होत आहे.

# मान्सूनची मोठी चिंता, देशात सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९नागपूर**

यंदाचा नैऋत्य मान्सून देशासाठी दिलासादायक ठरणार नसल्याचे संकेत भारतीय हवामान विभागाने (खचऊ) दिले आहेत. जून ते सप्टेंबर २०२६ या कालावधीत देशात दीर्घकालीन सरासरीच्या केवळ ९० टक्के पावसाची शक्यता वर्तवण्यात आली असून, सामान्यपेक्षा कमी पाऊस हीच सर्वाधिक शक्यता असल्याचे हवामान विभागाच्या अद्ययावत दीर्घकालीन अंदाजातून स्पष्ट झाले आहे.



**मान्सून कोअर झोनमध्ये पाऊस कमी**

विशेष म्हणजे, देशातील पावसावर अवलंबून असलेल्या 'मॉन्सून कोअर झोन'मध्येही पावसाचे प्रमाण कमी राहण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. हा भाग मुख्यतः कृषीप्रधान असून खरीप हंगामासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. त्यामुळे पावसातील घट शेती, जलसाठे, वीज निर्मिती आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवर परिणाम करू शकते, अशी भीती व्यक्त होत आहे.

**हवामान खात्याचा अंदाज**

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, मध्य भारत, दक्षिण द्वीपकल्प आणि उत्तर-पश्चिम भारतात सरासरीपेक्षा कमी पावसाची शक्यता अधिक आहे. ईशान्य भारतात मात्र तुलनेने सामान्य पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. देशातील बहुतांश भागात जून ते सप्टेंबरदरम्यान पावसाचे प्रमाण घटण्याची शक्यता असून काही मोजक्या भागांतच सामान्य किंवा त्यापेक्षा जास्त पाऊस पडू शकतो.

जून महिन्याचा अंदाज

जून महिन्याबाबतचा अंदाजही चिंताजनक आहे. जूनमध्ये देशभरात सरासरीपेक्षा कमी पाऊस होण्याची शक्यता असून बहुतांश राज्यांत पावसाची तूट राहू शकते. उत्तर-पश्चिम भारत, ईशान्य भारत आणि दक्षिण भारतातील काही भाग वगळता उर्वरित प्रदेशांत कमी पावसाचे संकेत देण्यात आले आहेत.

**इतर राज्यात स्थिती**

दरम्यान, जूनमध्ये उष्णतेच्या लाटांचे प्रमाण वाढण्याचाही इशारा हवामान विभागाने दिला आहे. उत्तर प्रदेश, हरियाणा, पंजाब, बिहार, ओडिशा, गुजरात, छत्तीसगड आणि आंध्र प्रदेशातील अनेक भागांत उष्णतेच्या लाटांचे दिवस वाढू शकतात. महाराष्ट्र, तेलंगणा, हिमाचल प्रदेश आणि तामिळनाडूतील काही भागांनाही त्याचा फटका बसण्याची शक्यता आहे.

# महाविकास विधान परिषदेच्या १७ पैकी १५ जागांवर मतैक्य

## काँग्रेस ८, ठाकरे ४, शरद पवार गट ३ जागा लढवणार; नांदेड, नाशिकवर तिढा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९मुंबई**-महाविकास आघाडीच्या नेत्यांना आज झालेल्या बैठकीत विधान परिषद निवडणुकीच्या जागावाटपाचा तिढा बव्हंशी सोडवण्यात यश मिळाले. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या माहितीनुसार, १७ पैकी तब्बल १५ जागांवर आघाडीतील तिन्ही घटकपक्षांमध्ये एकमत झाले. त्यात काँग्रेसने ८, उद्धव ठाकरे गटाने ४, तर शरद पवार गटाने ३ जागांवर दावा केला आहे. उर्वरित २ जागांवर अद्याप चर्चा सुरू असली तरी, आघाडीत समन्वय राखत एवढ्या मोठ्या प्रमाणावर मतैक्य होणे हे सत्ताधारी महायुतीविरोधात एकजुटीचे संकेत देणारे मानले जात आहे.

महायुतीच्या नेत्यांची आज मुंबईतील यशवंतराव चव्हाण सभागृहात बैठक झाली. या बैठकीनंतर बोलताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, विधान परिषद निवडणुकीच्या निमित्ताने २ दिवसांपूर्वी आमची प्राथमिक चर्चा झाली होती. आज अंतिमतः जागावाटपाच्या अनुषंगाने बैठक झाली. १७ पैकी १५ जागांवर आमचे एकमत झाले आहे. २ जागांवर आमची चर्चा सुरू आहे. पुढील २ दिवसांत या २ जागांवरही निर्णय होईल. नांदेड व नाशिक या २ जागांवर तिन्ही पक्षांनी दावा केला आहे.



यासंदर्भात २ जागा वगळता इतर ठिकाणी जागावाटपाचा निर्णय झाला आहे.

त्यात काँग्रेस चंद्रपूर, यवतमाळ, भंडारा - गोंदिया, अमरावती, अहिल्यानगर, सोलापूर, धाराशिव- बीड- लातूर, नागपूर या ८ जागांवर निवडणूक लढवेल. शिवसेना ठाकरे गट हा रत्नागिरी, जळगाव, परभणी - हिंगोली व संभाजीनगर या ४ जागा लढवेल. राष्ट्रवादी (शरद पवार) हा पक्ष पुणे, ठाणे, सातारा-सांगली या ३ जागांवर लढणार आहे. एकंदरीत या निवडणुकीला महाविकास आघाडी म्हणून सामोरे जात आहोत. भाजपच्या घोडेबाजाराला न जुमानता आम्ही लोकशाही वाचवण्यासाठी व सुसंस्कृत सभ्यपणा टिकवून ठेवण्यासाठी या निवडणुकीत आम्ही आमच्या घटनात्मक मूल्यांचा व महाराष्ट्र धर्माचा जागर करण्यासाठी या निवडणुकीला सामोरे जात आहोत.

# महायुतीचं विधानपरिषदेचं जागावाटप अंतिम टप्प्यात, फॉर्म्युला ठरला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९मुंबई**- आगामी विधानपरिषद निवडणुकीसाठी महायुतीच्या जागावाटपाची चर्चा आता अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. आज किंवा उद्या महायुतीच्या जागावाटपाचा फॉर्म्युला जाहीर होण्याची शक्यता आहे. आतापर्यंत १६ जागा संदर्भातली चर्चा पूर्ण झाली असून छत्रपती संभाजीनगर, जालना विधान परिषदेच्या जागेवर अजूनही तिढा कायम आहे. भाजप आणि शिवसेना दोन्ही पक्ष छत्रपती संभाजीनगर आणि जालना विधान परिषदेच्या जागेवर अडून बसले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये आकडेवारी पाहता १४ ठिकाणी भाजपचे वर्चस्व आहे. मात्र, भाजपने आपल्या




मित्रपक्षांना काही जागा सोडण्याची तयारी दर्शविली आहे. आतापर्यंत १६ जागांची चर्चा पूर्ण झाली आहे त्यामध्ये भाजप १०, शिवसेना ४ आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष २ जागा लढवण्याची शक्यता आहे. त्यानुसार शिवसेनेच्या वाट्याला ठाणे, यवतमाळ, नाशिक, परभणी आणि हिंगोली या चार जागा येण्याची शक्यता. तर राष्ट्रवादी काँग्रेसला पुणे आणि कोकणाची जागा मिळू शकते, असा अंदाज आहे. उर्वरित सर्व जागांवर भाजप लढेल, असे दिसत आहे. यामध्ये नागपूर, अहिल्यानागर, धाराशिव, जळगाव, सोलापूर, लातूर, नांदेड, अमरावती, वर्धा-गडचिरोली-चंद्रपूर, भंडारा-गोंदिया, सातारा-सांगली या जागांचा समावेश आहे. १७ पैकी १६ जागांचा तिढा जवळपास सुटला, १६ पैकी दहा जागांवर भाजप चार जागांवर शिवसेना आणि दोन जागांवर राष्ट्रवादी निवडणूक लढणार असल्याची सूत्रांची माहिती. छत्रपती संभाजीनगर, जालना विधान परिषदेची जागेचा तिढा आज किंवा उद्या सुटल्यास अंतिम फॉर्म्युला समोर येईल. या निवडणुकीसाठी १ तारखेला अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस आहे.

# 'ऑपरेशन अंतिम प्रहार' यशस्वी! जंगलातील माओवाद्यांचा शस्त्र कारखाना उद्ध्वस्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९गडचिरोली**

: जिल्हा पोलिस दल आणि छत्तीसगडमधील नारायणपूर पोलिसांनी संयुक्तपणे एक मोठी आंतरराज्यीय मोहीम राबवून माओवाद्यांच्या घातपाती कारवायांचा डाव उधळून लावला.

सीमावर्ती दुर्गम जंगलात सुरू असलेला माओवाद्यांचा शस्त्रास्त्र निर्मिती कारखाना सुरक्षा दलांनी बुधवारी (२७मे) उद्धवस्त केला. 'ऑपरेशन अंतिम प्रहार' अंतर्गत चार दिवसांपूर्वी बिनागुंडा येथे शस्त्र निर्मिती कारखाना उद्धवस्त केल्यानंतर जवानांनी हिंसक चळवळीला आणखी एक धक्का दिला आहे.

गडचिरोली पोलिसांपुढे नुकत्याच आत्मसमर्पण केलेल्या काही माओवाद्यांची सखोल चौकशी करण्यात आली. या दरम्यान त्यांनी छत्तीसगडच्या नारायणपूर जिल्ह्यातील काकूर ठाण्यापासून ७ किमी अंतरावर असलेल्या सीमावर्ती जंगलात शस्त्रे आणि ती बनविण्याचा कारखाना लपवून ठेवल्याची अत्यंत गोपनीय माहिती दिली. विशेष अभियान पथक (प्राणहिता) च्या ४ तुकड्या, डीआरजी नारायणपूरचे १ पथक आणि बीडीडीएस (बॉम्ब शोधक व नाशक) प्राणहिताच्या २ पथकांनी २६ मे रोजी जंगलात



वेगाने शोध मोहीम सुरू केली. सुरक्षा पथकांनी काकूरजवळील घनदाट जंगलाची कसून तपासणी केली असता, माओवाद्यांनी जमिनीखाली लपवून ठेवलेला मोठा शस्त्रसाठा आणि फॅक्टरीचे साहित्य हाती लागले. यामध्ये आधुनिक इन्सास रायफलसह अनेक जिवंत काडतुसे, ११० डेटोनेटर्स, कॉर्टेक्स वायर, ५०० हून अधिक बीजीएल (बॅरल ग्रेनेड लॉन्चर) सेल, ७ बीजीएल लॉन्चर आणि ३ ट्युब लॉन्चर जप्त करण्यात आले.

२ धक्कादायक बाब म्हणजे, जंगलात शस्त्रे तयार करण्यासाठी माओवाद्यांनी चक्क २ लेथ मशीन, २ मोटर, ग्राइंडर मशीन, इन्व्हर्टर, बॅटरी आणि सोलर प्लेट्स अशी अद्ययावत यंत्रसामग्री बसवली होती. जवानांनी घटनास्थळावरून मिळालेले हे शस्त्रनिर्मितीचे साहित्य वरिष्ठांच्या आदेशानुसार जागीच नष्ट केले.पोलिस अधीक्षक एम. रमेश, अपर अधीक्षक (अभियान) कार्तिक मधिरा, गोकुल राज जी., हर्षवर्धन बी. जे., उपअधीक्षक विशाल नागरगोजे, नारायणपूरचे उपअधीक्षक मनोज मंडावी यांच्या नेतृत्वात जवानांनी मोहीम फत्ते केली.

## संपादकीय ......

# धोरणाचा वांदा, म्हणून रडवतोय कांदा!

*महाराष्ट्रातील कांदा उत्पादक शेतकर्यांच्या प्रश्नावर सरकारची भूमिका पाहता, शासनाला समस्या कायमस्वरूपी सोडवण्यात रस नसून त्या समस्येवर तात्पुरत्या मलमपट्टीचे राजकारण करण्यात अधिक रस असल्याचे दिसते. शेतकरी अडचणीत सापडतो, बाजार कोसळतो, आंदोलन उभे राहते, रस्ते रोखले जातात, संताप उसळतो आणि मग सरकार अचानक जागे झाल्यासारखे बैठका घेते, घोषणा करते, खरेदीचे आश्वासन देते आणि शेतकर्यांना दिलासा दिल्याचे चित्र निर्माण करते. पण प्रत्यक्षात प्रश्न तिथेच राहतो. पुढच्या हंगामात पुन्हा तीच परिस्थिती, पुन्हा तोच संघर्ष आणि पुन्हा तेच सरकारी आश्वासन. कांद्याचा प्रश्न हा शासनाच्या अपयशी धोरणांचा आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेतील असमतोलाचा जिवंत पुरावा बनला आहे.*

*दिल्लीतील बैठकीनंतर केंद्र सरकारने दहा लाख टन कांदा खरेदीचा प्रस्ताव मांडला, नाफेड आणि इतर संस्थांमार्फत थेट खरेदीचे संकेत दिले, कांदा बियाणे निर्यातीवर अतिरिक्त कराचा विचार सुरू असल्याचे सांगितले आणि शेतकर्यांना मोठा दिलासा दिल्याचे वातावरण तयार झाले. पण हे चित्र वरवर आकर्षक असले तरी वास्तवात अनेक गंभीर प्रश्न उपस्थित होतात. अशा घोषणा यापूर्वीही अनेक वेळा झाल्या आहेत. शेतकर्यांनी त्या ऐकल्या आहेत, त्यावर विश्वास ठेवला आहे आणि शेवटी फसवणूक झाल्याची भावना अनुभवली आहे. केंद्र आणि राज्य सरकार जेव्हा कांदा खरेदीची भाषा करतात, तेव्हा त्याचा खरा उद्देश काय असतो याचाही विचार करण्याची वेळ आली आहे. सरकार ज्या प्रकारे बाजार हस्तक्षेप योजना राबवते, त्यामागे शेतकर्यांचे हित कमी आणि ग्राहकांना महागाईपासून वाचवण्याची धडपड अधिक दिसते. कांद्याचे भाव वाढले की सरकारला अचानक ग्राहकांची आठवण येते. निर्यातबंदी लागू होते, निर्यातीवर कर बसतो, साठेबाजीविरोधात कारवाईची भाषा सुरू होते, बाजारात सरकारी कांदा आणला जातो. पण जेव्हा शेतकर्यांना दोन रुपये किलो दराने कांदा विकावा लागतो, तेव्हा त्याच सरकारला बाजाराच्या स्वातंत्र्याची आठवण होते. ही दुहेरी भूमिका शेतकर्यांच्या जखमेवर मीठ चोळणारी आहे.यंदा अवकाळी पाऊस, गारपीट आणि अतिवृष्टीमुळे कांद्याच्या उत्पादनात मोठी घट झाली. अनेक शेतकर्यांचे पीक सडले. राज्य कृषी मूल्य आयोगाने उत्पादन खर्च साधारण अठराशे रुपये प्रतिक्विंटल मान्य केला आहे. अशा स्थितीत जर सरकार बाराशे–तेराशे रुपयांत कांदा खरेदी करत असेल, तर त्याला मदत म्हणायचे की शोषण? उत्पादन खर्चापेक्षा कमी दर देऊन सरकार शेतकर्यांना दिलासा देत असल्याचा आव आणते, पण प्रत्यक्षात शेतकर्यांचे आर्थिक नुकसान अधिक वाढते. कांद्याच्या खरेदीत होणारे गैरव्यवहार हा देखील अत्यंत गंभीर मुद्दा आहे. यापूर्वी नाफेड आणि इतर संस्थांच्या माध्यमातून झालेल्या खरेदी प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचे आरोप झाले.*

*नाशिक आणि नगर जिल्ह्यात शेकडो कोटी रुपयांचे गैरव्यवहार उघड झाले. जगातील अनेक देशांमध्ये भारतीय कांद्याला मोठी मागणी आहे. पण भारतातील अस्थिर निर्यात धोरणामुळे परदेशी बाजारपेठांमध्ये भारतीय व्यापारावर विश्वास राहिलेला नाही. कधी निर्यातबंदी, कधी निर्यात शुल्क, कधी अचानक निर्बंध, या सगळ्यामुळे परदेशी खरेदीदार इतर देशांकडे वळतात. परिणामी, भारतीय शेतकरी जागतिक बाजारपेठेतील मोठ्या संधीपासून वंचित राहतो. सरकारने जर खरोखरच कांदा उत्पादक शेतकर्यांना न्याय द्यायचा असेल, तर सर्वप्रथम दीर्घकालीन निर्यात धोरण जाहीर करणे आवश्यक आहे. कांद्याची निर्यात ही सातत्यपूर्ण आणि स्थिर असावी. सरकारने आधुनिक साठवणूक केंद्रे उभारण्याबाबत अनेक घोषणा केल्या; पण प्रत्यक्षात त्याचा वेग अत्यंत संथ आहे. प्रक्रिया उद्योगांनाही पुरेशी चालना मिळालेली नाही. कांद्यापासून पावडर, पेस्ट, वाळवलेला कांदा यांसारखी उत्पादने मोठ्या प्रमाणावर तयार होऊ शकतात. पण या क्षेत्रात नियोजनाचा अभाव स्पष्टपणे दिसतो.बाजार समित्यांमधील परिस्थितीदेखील तितकीच चिंताजनक आहे. लिलाव प्रक्रियेत पारदर्शकतेचा अभाव, व्यापार्यांचे वर्चस्व, दलालांचे नियंत्रण आणि प्रशासनाची निष्क्रियता यामुळे शेतकर्यांना योग्य दर मिळत नाहीत. अनेक वेळा बाजार समित्यांमध्ये कृत्रिमरीत्या दर पाडले जातात. शेतकरी कर्जबाजारी असल्याने आणि माल जास्त काळ साठवून ठेवण्याची क्षमता नसल्याने तो कमी दरात माल विकण्यास भाग पडतो. सरकारने जर खरेदी करायचीच असेल, तर ती खुल्या लिलाव प्रक्रियेत, पूर्ण पारदर्शकतेने आणि प्रशासनाच्या देखरेखीखाली करणे आवश्यक आहे. पण तशी इच्छाशक्ती दिसत नाही. सरकारने आता कांदा उत्पादक शेतकर्यांना फक्त आंदोलन करणारा वर्ग म्हणून पाहणे थांबवले पाहिजे. हा वर्ग देशाच्या अन्नसाखळीचा कणा आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा आधार आहे.*

*शेतकरी फक्त सहानुभूती मागत नाही; तो न्याय मागत आहे. त्याला उत्पादन खर्चावर आधारित हमीभाव हवा आहे. स्थिर निर्यात धोरण हवे आहे. पारदर्शक खरेदी व्यवस्था हवी आहे. साठवणूक आणि प्रक्रिया उद्योगांची मजबूत साखळी हवी आहे. पण सरकार अजूनही तात्पुरत्या घोषणांमधून स्वत:ची जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न करत आहे. आज परिस्थिती अशी आहे की, कांदा उत्पादक शेतकरी सरकारच्या प्रत्येक घोषणेकडे संशयाने पाहू लागला आहे. त्याने वारंवार अनुभवले आहे की सरकार आधी प्रश्न वाढू देते आणि नंतर त्यावर तात्पुरते उपाय करून स्वत:ला तारणहार म्हणून सादर करते. पण या सगळ्या प्रक्रियेत शेतकर्यांचे आयुष्य उद्ध्वस्त होत राहते. त्यामुळे आता वेळ आली आहे ती घोषणांच्या राजकारणातून बाहेर पडून शाश्वत धोरणांची. अन्यथा महाराष्ट्रातील कांदा उत्पादक शेतकर्यांचे प्रश्न दरवर्षी अधिक उग्र होत राहतील, आंदोलने पेटत राहतील आणि शासनाची संवेदनशीलतेची भाषा केवळ कागदापुरती मर्यादित राहील.*

# पुराचा धोका, संरक्षणभिंत खचल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

**गाळ साचल्याने मिठ्ठूनाला झाला उथळ**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९कापूसतळणी**

गावाच्या मध्यभागातून वाहणाऱ्या मिठ्ठूनाल्यात मोठ्या प्रमाणात गाळ साचल्याने नाला उथळ झाला. त्यामुळे पावसाळ्यात पूरस्थिती निर्माण होण्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे. नाल्यालगतची संरक्षणभिंत अनेक ठिकाणी खचली असून पावसाळ्यापूर्वी तातडीने खोलीकरण व दुरुस्तीची मागणी होत आहे. रत्नापूर पुलापासून बंडू मळसणे यांच्या घरापर्यंत नाल्याच्या दोन्ही बाजूंना दगडी संरक्षणभिंत बांधण्यात आली होती. मात्र सध्या ही भिंत अनेक ठिकाणी पडझड झालेल्या अवस्थेत आहे. नाल्यात मोठ्या प्रमाणात गाळ, केरकचरा व जलवनस्पती साचल्याने पाण्याचा प्रवाह मंदावला असून नाल्याला नालीचे स्वरूप प्राप्त झाले आहे. जोरदार पावसात या नाल्याला पूर येतो. उथळ झालेल्या नाल्यात



पाणी अडून पुराचे पाणी नाल्याकाठच्या वस्त्यांमध्ये तसेच मुख्य रस्त्यावर शिरते. या नाल्यापलीकडे रत्नापूर, बोरगाव, अंबाडा, नारायणपूर तसेच नव्याने विकसित झालेल्या वस्तींकडे जाणारा मुख्य मार्ग असल्याने वाहतुकीवर परिणाम होतो. त्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. नाल्यात साचलेल्या घाण पाण्यामुळे डासांची उत्पत्ती वाढली असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. तसेच पावसाळ्यात विषारी सरपटणारे प्राणी घरांमध्ये शिरत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. जुलै २००७ मध्ये अतिवृष्टीमुळे मिठ्ठूनाल्याला महापूर आला होता. त्यावेळी पुराचे पाणी घरांमध्ये शिरल्याने अनेक कुटुंबांचे मोठे नुकसान झाले होते. घरांची पडझड होऊन नागरिकांना जीवनावश्यक वस्तू, अन्नधान्य व पाळीव जनावरे गमवावी लागली होती. अशी परिस्थिती पुन्हा उद्भवू नये, यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

# दीड वर्षांचा पाणंद रस्त्याचा वाद मिटला

## शेतकऱ्यांनी मानले मोर्शीच्या तहसीलदारांचे आभार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९मोर्शी** तालुक्यातील अनेक पाणंद रस्त्यांवरील वाद मिटवून शेतकऱ्यांना दिलासा मिळवून देण्यात प्रशासनाला यश आले आहे. कोपरा व अहमदपूर यांच्या सीमेवरील एका पाणंद रस्त्याचा दीड वर्षांपासून प्रलंबित असलेला वाद अखेर निकाली काढण्यात आला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी तहसीलदारांचे आभार मानले आहेत. महाराष्ट्र शासनाच्या पाणंद रस्ते योजनेतर्गत मोर्शी तालुक्यात गेल्या वर्षभरात अनेक शेतकऱ्यांना शेतापर्यंत जाण्यासाठी रस्त्यांची सुविधा उपलब्ध झाली असून, आगामी पावसाळ्यात या रस्त्यांचा मोठा फायदा होणार आहे. मौजे कोपरा व अहमदपूर यांच्या सीमेवरील संबंधित ठिकाणी एकाच शेतकऱ्याची दोन्ही मौजांमध्ये शेती असल्याने पाणंद रस्त्याच्या



अडवणुकीमुळे काम रखडले होते. परिणामी, मागील पावसाळ्यात परिसरातील शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला होता. सदर प्रकरणी तहसील कार्यालयाच्या माध्यमातून सर्व संबंधित पक्षांमध्ये समन्वय साधून वाद मिटविण्यात आला. त्यानंतर पाणंद रस्त्याचे काम युद्धपातळीवर सुरू करण्यात आले असून येणाऱ्या पावसाळ्यात शेतकऱ्यांना रस्त्याच्या समस्येचा सामना करावा लागणार नाही, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. या निर्णयामुळे परिसरातील शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण असून प्रशासनाच्या कामकाजाबद्दल आनंद व्यक्त करण्यात येत आहे. विशेषतः मोर्शीचे तहसीलदार सागर ढवळे तसेच संबंधित शासकीय कर्मचाऱ्यांचे शेतकऱ्यांनी आभार मानले आहेत.

# फुबगाव येथील ३४ कुटुंबे पुनर्वसनाच्या प्रतीक्षेत

## जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन, एक जूनपासून उपोषणाचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९चांदूरबाजार,**
तालुक्यातील फुबगाव-सैदापूर येथील ३४ बाधित कुटुंबांचे पुनर्वसन अद्याप झाले नाही. त्यामुळे या बाधित कुटुंबांनी एक जूनपासून चांदूरबाजार तहसील कार्यालयात पुढे बेमुदत उपोषण करण्याचा इशारा जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून दिला आहे. १९ जुलै २०२२ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे दरड कोसळून मोठी दुर्घटना घडली होती. या दुर्घटनेत एकाच कुटुंबातील आई व मुलीचा मृत्यू झाला होता. त्यानंतर जिल्हा प्रशासनाने बाधित कुटुंबांचे तत्काळ पुनर्वसन करण्याचे आदेश दिले होते. मात्र जवळपास चार वर्षांचा कालावधी उलटूनही अद्याप ३४ बाधित कुटुंबांचे कायमस्वरूपी पुनर्वसन करण्यात आलेले नसल्याचा आरोप बाधित नागरिकांनी केला आहे. सध्या काही कुटुंबे जिल्हा परिषद शाळेत, तर एक कुटुंब समाजमंदिरात राहत असून उर्वरित कुटुंबे जीव मुठीत धरून त्याच धोकादायक परिसरात वास्तव्य करीत आहेत. आगामी पावसाळ्यात पुन्हा दरड कोसळून जीवितहानी होण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. गावातील उपलब्ध शासकीय जागेवर पुराचा धोका असल्याने योग्य पुनर्वसन होऊ शकत नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. मौजा फुबगाव येथील वर्ग-एक गट क्रमांक १०९ व ११० चे मालक रमेश भगवंतराव चिचखेडे यांनी पुनर्वसनासाठी स्वतःची शेती देण्याची लेखी तयारी तहसीलदारांकडे दर्शविल्याचे दिलेल्या निवेदनामध्ये स्पष्ट करण्यात आले आहे. या मागणीसाठी बाधित कुटुंबांनी २६ फेब्रुवारी २०२४ ते एक मार्च २०२४ दरम्यान तहसील कार्यालय चांदूरबाजार येथे बेमुदत उपोषण केले होते. त्यावेळी तहसीलदारांनी प्रस्ताव पाठवून कायमस्वरूपी पुनर्वसन करण्याचे लेखी आश्वासन दिले होते. मात्र अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याने संतप्त झालेल्या बाधित कुटुंबांनी पुन्हा एक जून २०२६ पासून तहसील कार्यालयासमोर उपोषण करण्याचा इशारा जिल्हाधिकाऱ्यांना निवेदनामधून दिला आहे. प्रशासनाने तातडीने कार्यवाही करून सर्व बाधित कुटुंबांचे सुरक्षित ठिकाणी कायमस्वरूपी पुनर्वसन करावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. निवेदन देतेवेळी श्रीकृष्ण वऱ्हाडे, निरंजन कुरवाडे, दिलीप वऱ्हाडे, उत्तमराव वऱ्हाडे, राजू बोरवार, दादाराव वऱ्हाडे, भारत वऱ्हाडे, विलास वऱ्हाडे, रमेश भानगे, रोशन वऱ्हाडे, देविदास वऱ्हाडे, अशोक वऱ्हाडे, नीलेश वऱ्हाडे आदी उपस्थित होते.

# वस्तूंच्या मनमानी किंमतीविरुद्ध ग्राहकपंचायत आक्रमक

## तहसीलदारांमार्फत पंतप्रधान कार्यालय, ग्राहक व्यवहार मंत्रालयाला निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अंजनगाव सुर्जी**
अखिल भारतीय ग्राहक पंचायतच्या वतीने केंद्र शासनाकडे औषधे, कृषी आदाने व दैनंदिन वापराच्या वस्तूंवरील मनमानी किंमत प्रणालीविरोधात येथील तहसीलदारांमार्फत पंतप्रधान कार्यालय, ग्राहक व्यवहार मंत्रालय तसेच संसदीय स्थायी समित्यांकडे निवेदन पाठविण्यात आले आहे. सदर निवेदनामध्ये विविध वस्तूंच्या एमआरपी प्रणालीमध्ये कोणतीही वैज्ञानिक, पारदर्शक किंवा कायदेशीर मर्यादा नसल्याने कंपन्यांकडून उत्पादनाच्या वास्तविक किमतीपेक्षा अनेक पटीने जास्त दर आकारले जात असल्याचा गंभीर मुद्दा मांडण्यात आला आहे. विशेषतः औषधे, ओटीसी उत्पादने, बियाणे, सूक्ष्म अन्नद्रव्ये, कीटकनाशके व इतर कृषी आदानांमध्ये ग्राहक व शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक शोषण होत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. निवेदनात जपान, युरोप व अमेरिकेतील नियंत्रित मूल्य प्रणालींचा संदर्भ देत भारतात तशी प्रणाली लागू करण्याची मागणी करण्यात आली आहे. या



प्रणाली अंतर्गत उत्पादन खर्च, वाहतूक खर्च, मर्यादित नफा (पाच ते दहा टक्के) या सूत्रानुसार किंमत निश्चित करण्याची सूचना करण्यात आली आहे. तसेच डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय जी उत्पादने विक्रीसाठी उपलब्ध होतात ती उत्पादने व कृषी आदानांवर किंमत नियंत्रण लागू करावे, कंपन्यांनी उत्पादन खर्च व नफा सार्वजनिक करणे बंधनकारक करावे, राष्ट्रीय औषध मूल्य निर्धारण प्राधिकरणचे कार्यक्षेत्र विस्तारावे, स्वतंत्र कृषी मूल्य नियामक मंडळ स्थापन करावे, फसव्या व अन्यायकारक किंमत निर्धारणावर कठोर दंडात्मक कारवाई करावी आदी मागण्या निवेदनामध्ये नमूद करण्यात आल्या. तसेच ५० रुपये खर्च असलेल्या उत्पादनावर २०० रुपये एमआरपी लावणे हे आर्थिक व मानसिक दिशाभूल करणारे असून ग्राहक संरक्षण कायदा तसेच भारतीय न्याय संहितेअंतर्गत गंभीर परीक्षणाचा विषय ठरू शकतो. संघटनेने केंद्र सरकारला ग्राहक व शेतकरी हितासाठी पारदर्शक, न्याय्य व वैज्ञानिक किंमत निर्धारण प्रणाली तातडीने लागू करण्याचे आवाहन केले आहे. हे निवेदन पंतप्रधान कार्यालय, ग्राहक व्यवहार मंत्रालय तसेच संसदीय स्थायी समित्यांकडे पाठविण्यात आले आहे. अखिल भारतीय ग्राहक पंचायत, विदर्भ प्रांतचे अध्यक्ष नारायण मेहरे, पश्चिम क्षेत्र संघटन मंत्री नितीन काकडे, सचिव चारुदत्त चौधरी, संघटन सचिव अभय खेडेकर संयुक्त सचिव आनंद संगई, सहसचिव विलास ठोसर यांच्या वतीने येथील तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. यावेळी स्थानिक ग्राहक पंचायतचे पदाधिकारी व अनेक ग्राहक उपस्थित होते.

# दर्यापूर शहराने घेतला मोकळा श्वास

## अतिक्रमण हटविल्याने ‘कहीं ख़ुशी कहीं गम’

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९दर्यापूर,**
शहरात प्रशासनाने राबविलेल्या अतिक्रमण हटाव मोहिमेमुळे मुख्य रस्ते व बाजारपेठ परिसर मोकळा झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. अनेक वर्षांपासून रस्त्यालगत वाढलेल्या अतिक्रमणामुळे वाहतूक कोंडी, पादचाऱ्यांची गैरसोय आणि अपघातांचा धोका वाढला होता. कारवाईनंतर शहराने जणू मोकळा श्वास घेतल्याची भावना अनेक नागरिकांनी व्यक्त केली. शहरातील प्रमुख चौक, बाजारपेठ आणि रस्ते मोकळे झाल्याने वाहतुकीला गती मिळाली. शाळकरी विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक व पादचाऱ्यांसाठी चालणे अधिक सोयीचे झाल्याचे मत व्यक्त होत आहे. मात्र दुसरीकडे, छोट्या व्यावसायिक आणि



हातगाडीधारकांमध्ये नाराजीचे सूरही उमटत आहेत. अनेकांचे रोजगार अतिक्रमण हटाव मोहिमेमुळे प्रभावित झाल्याने उपजीविकेचा प्रश्न निर्माण झाला, अशी खंत काहींनी व्यक्त केली. त्यामुळे शहरात ‘कहीं खुशी, कहीं गम’चे वातावरण निर्माण झाल्याचे चित्र दिसून येत आहे. नागरिकांनी प्रशासनाने वाहतूक सुरळीत ठेवण्याबरोबरच पर्यायी व्यवस्था, नियोजनबद्ध फेरीवाला झोन आणि रोजगाराच्या दृष्टीने सकारात्मक पावले उचलण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे. शहर सुशोभीकरणासोबत सर्वसामान्यांच्या हिताचाही समतोल राखण्याची गरज असल्याचे मत पुढे येत आहे.

# सर्वोच्च न्यायालयाच्या निकालापूर्वी पदोन्नती नको

## घाईने प्रक्रिया राबविल्यास राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती–** टीईटी संदर्भातील प्रकरणावर सर्वोच्च न्यायालयाचा अंतिम निकाल येईपर्यंत पदवीधर शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख व विस्तार अधिकारी पदोन्नती प्रक्रिया स्थगित ठेवावी, अशी मागणी प्राथमिक शिक्षक मध्यवर्ती संघटनेने शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांच्याकडे केली आहे.

शासनाने ही मागणी अमान्य करून घाईघाईने पदोन्नती प्रक्रिया राबविल्यास शैक्षणिक वर्षाच्या सुरवातीलाच राज्यव्यापी आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही संघटनेने दिला आहे.

मंगळवारी (ता. २६) मंत्रालयात प्राथमिक शिक्षक मध्यवर्ती संघटनेच्या शिष्टमंडळाने शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांची भेट घेत निवेदन सादर केले. टीईटी संदर्भातील ६८ याचिकांवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पूर्ण झाली असून अंतिम निकाल प्रलंबित आहे. त्यामुळे निकाल येईपर्यंत पदोन्नती प्रक्रिया राबवू नये, अशी भूमिका संघटनेने मांडली. यावेळी शिक्षणमंत्री भुसे यांनी राज्य शासन सेवाज्येष्ठ शिक्षकांचे हित जपेल व कोणावरही अन्याय होणार नाही, अशी ग्वाही दिली. चर्चेतून हा प्रश्न मार्गी लावला जाईल, त्यामुळे आंदोलनाची वेळ येणार नाही, असेही त्यांनी सांगितले.

तसेच शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल यांना दूरध्वनीद्वारे संपर्क साधून सर्वोच्च न्यायालयाचा अंतिम निकाल येईपर्यंत पदोन्नती प्रक्रिया स्थगित ठेवण्याबाबत शिक्षण संचालक (प्राथमिक) यांना सूचना देण्यास सांगितल्याची माहितीही त्यांनी दिली. यानंतर संघटनेच्या शिष्टमंडळाने प्रधान सचिव रणजितसिंह देओल यांचीही भेट घेतली.

मंत्री महोदयांच्या निर्देशानुसार शिक्षण संचालक (प्राथमिक) यांना आवश्यक सूचना देण्यात येतील, असे देओल यांनी सांगितले. या भेटीत संघटनेचे राज्याध्यक्ष केशवराव जाधव, सरचिटणीस राजेश सुर्वे, कोषाध्यक्ष साजिद अहमद, प्रसिद्धी प्रमुख मनोज मराठे, संघटक प्रसाद पाटील, कल्याण लवांडे, प्रसाद म्हात्रे, प्रमोद पाटील आदी उपस्थित होते. अशी माहिती महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे राज्य प्रसिद्धी प्रमुख तथा अमरावती जिल्हा कार्याध्यक्ष विनायक लकडे यांनी दिली.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब – पोर्टल /ई – पेपर

### विधान परिषद निवडणूक.....

# काँग्रेस ताकदीने मैदानात उतरणार की पुन्हा एकदा भाजपसमोर शरणागती पत्करणार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९अमरावती** विधान परिषदेच्या अमरावती स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघ निवडणुकीसाठी नामांकन दाखल करण्यास अवघे दोन दिवस उरले असताना भाजपने आपला उमेदवार जवळपास निश्चित करून शक्तिप्रदर्शनाची तयारी सुरू केली आहे. दुसरीकडे काँग्रेसकडून मात्र अद्याप अधिकृत उमेदवाराची घोषणा न झाल्याने राजकीय वर्तुळात उलटसुलट चर्चांना उधाण आले आहे. काँग्रेस खरोखरच निवडणूक लढविण्याच्या तयारीत आहे की, पुन्हा एकदा भाजपला मागच्या दरवाजाने मदत करण्याची भूमिका घेत आहे, असा सवाल आता नगरसेवकांमधून उपस्थित होऊ लागला आहे.

भाजपकडून माजी मंत्री प्रवीण पोटे-पाटील यांचे नाव जवळपास निश्चित झाले असून त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी जोरदार तयारी केली आहे. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत शक्तिप्रदर्शन करण्याचेही संकेत आहेत. त्यामुळे भाजपने निवडणुकीच्या रणांगणात स्पष्ट आघाडी घेतल्याचे चित्र आहे. मात्र काँग्रेसमध्ये अद्याप उमेदवाराच्या नावाभोवती कायम आहे. पक्षाच्या स्थानिक नेत्यांकडून योग्य वेळेत नाव जाहीर करू एवढेच सांगितले



जात असले आहे. काँग्रेसच्या या संथ भूमिकेमुळे नगरसेवकांमध्येही नाराजीचा सूर उमटत आहे.

या निवडणुकीत नगरसेवकच मतदार असल्याने नगरसेवकांना एकादमदार काँग्रेस उमेदवाराची प्रतीक्षा आहे. लढत तुल्यबळ असली तरच राजकीय व्यवहार आणि नजराण्याचे मुल्य वाढते, हे राजकारणातील उघड गुपित आहे. मागील निवडणुकीत काँग्रेसच्या कमकुवत उमेदवारीमुळे अनेकांची अपेक्षा फोल ठरली होती. त्यामुळे यंदा काँग्रेस दमदार उमेदवार देणार का जेणेकरून नगरसेवकांना पोहोचणाऱ्या नजरण्यातही वाढ होईल आणि तेव्हाच ही निवडणूकीतही रंगत येईल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.दरम्यान, काँग्रेसमधून हर्षजीत देशमुख, गोपिकिशन बाजोरिया, अनिल अग्रवाल यांची नावे चर्चेत आहे. बबलू देशमुख आणि वीरेंद्र जगताप यांनी निवडणूक लढविणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळेकाँग्रेसमध्ये नेमके काय सुरू आहे, हा प्रश्न अधिकच गडद झाला आहे. एरवी राज्यस्तरावर महाविकास आघाडीची बैठक घेऊन निवडणुकीवर मंथन केले. दोन दिवसात पुन्हा बैठक घेण्याचे बुधवारी ठरविले होते. त्याकडे अनेकांच्या नजरा लागलेल्या आहेत.


राजकीय विश्लेषकांच्या मते, काँग्रेसची ही शांतता रणनीतीचा भाग असू शकते; पण वेळ निघून गेल्यानंतर उमेदवार जाहीर करण्याचा फारसा फायदा होत नाही. उलट कार्यकर्ते आणि समर्थकांमध्ये संभ्रम वाढतो. त्यामुळे काँग्रेस शेवटच्या क्षणी खरोखरच ताकदीने मैदानात उतरणार की पुन्हा एकदा भाजपसमोर शरणागती पत्करणार, याची उत्सुकता आता शिगेला पोहोचली आहे.

# १.२१ लाख लाडक्या बहिणी हद्दपार ?

### प्रचंड आक्रोश, महिला बालकल्याण विभागात लाभार्थ्यांच्या येरझारा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९ अमरावती**मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेअंतर्गत अटी शर्तींच्या नावाखाली दुसऱ्यांदा लाभार्थी महिलांना डच्चू देण्यात



आलेला आहे. एका कुटुंबातील एकाच महिलेला लाभ देण्यात येईल, वय मर्यादा, घरी चारचाकी असेल आणि केवायसी केल्यानंतर किंवा केवायसीमध्ये त्रुटी इत्यादी कारणांवरून महिलांना अपात्र ठरविण्यात आलेले आहे. पहिल्या टप्प्यात २१ वर्षांपेक्षा कमी व ६५ वर्षापेक्षा अधिक वयाच्या १२,३५१ लाभार्थ्यांसह ६६,८१८ तर दुसऱ्या टप्प्यात ५५,०००, अशा एकूण जिल्ह्यातील एक लाख एकवीस हजारआठशे अठरा लाडक्या बहिणींना योजनेतून डच्चू देत त्यांचा लाभ बंद करण्यात आल्याची माहिती आहे.

तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आणलेल्या मुख्यमंत्री लाडकी बहिणी योजनेच्या लाभार्थ्यांची सरकार स्तरावरुन पडताळणी केली जात आहे. या योजनेचा आर्थिक भार अन्य विभागांवर होत असल्याने अपात्र लाडक्या बहिणींना यादीतून वगळण्याचे काम सुरु झाले आहे.जिल्ह्यातून या या योजनेसाठी ७लाख २० हजार ५७५ महिलांनी अर्ज केले होते. त्यापैकी २२ हजार ४७२ अर्जअपात्र ठरविण्यात आले होते. ६ लाख ९८ हजार १०३ बहिणींना लाभ देण्यात आला.विधानसभा निवडणुकीपूर्वी लाडक्या बहिण योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आलेले होते. त्यामध्ये आता दिवसेंदिवस अटी व शर्तीचे निकष लावून लाभार्थी बहिणींची संख्या कमी केली जात आहे. जिल्ह्यात एकाच कुटुबातील दोन पेक्षा अधिकमहिलांनी लाभ घेतल्याचे पडताळणीतून दिसून आले. एकाच कुटुंबातील एक विवाहीत तर एक अविवाहीत असणे आवश्यक असल्याने या अटीमध्ये न बसणाऱ्या सर्वाधिक ४९ हजार ४९३ लाडक्या बहिणींना वगळण्यात आल्याचे महिला बालकल्याण विभागाच सूत्रांकडून सांगण्यात आले.

#### चारचाकी वाहनधारक ४७०७ महिला

चारचाकी वाहन असलेल्या ५ हजार ९९२ लाडक्या बहिणींची यादी शासनाकडून महिला व बालविकास विभागाला प्राप्त झाली होती. ती यादी आरटीओ कार्यालयाकडे पडताळणीकरिता पाठविली होती. त्यापैकी ४ हजार ७०७ लाडक्या बहिणींच्या नावाने चारचाकी वाहन असल्याचे स्पष्ट झाल्याने त्या महिलांना वगळण्यात आले आहे.

# जिल्ह्यातील सिंचन प्रकल्पात ४१.३९ टक्के जलसाठा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९अमरावती**

अमरावती जिल्ह्यातील सिंचन प्रकल्पात गतवर्षीचा बराच साठा शिल्लक असल्याने यावर्षी सिंचनासह पुरवठ्यासाठी मुबलकसाठा निर्माण होण्याचा अंदाज आहे. सद्य:स्थितीत जिल्ह्यातील सिंचन प्रकल्पांत ४१.३९ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. त्यामुळे आगामी पावसाळ्यात धरणांतून पाण्याचा विसर्ग करण्याची वेळ येणार आहे. अमरावती जिल्ह्यात अप्पर वर्धा या मोठ्या धरणांत सध्या २६१.४२ दशलक्ष घनमीटर (टीएमसी) जलसाठा शिल्लक असून तो एकूण जलसंचय क्षमतेच्या ४६ टक्के आहे. या धरणातून अमरावती शहरासह ग्रामीण पाणी पुरवठा योजनांना पाणीपुरवठा करण्यात येतो. एकूण ७ मध्यम प्रकल्प असून त्यातील शहानूरमध्ये १८.५० दशलक्ष घनमीटर, चंद्रभागामध्ये ३२.५५ दशलक्ष घनमीटर, पूर्णा प्रकल्पांत २२.२६ दशलक्ष घनमीटरसपनमध्ये १७.४८ दशलक्ष घनमीटर, पंढरीमध्ये १२.५० दशलक्ष घनमीटर जलसाठा शिल्लक आहे. सर्व मध्यम प्रकल्प मिळून १०३.६४ दशलक्ष घनमीटर जलसाठा असून एकूण जलसंचय क्षमतेच्या तो ४०.४५ टक्के आहे. ४८ लघू प्रकल्पांत ६८.४१ दशलक्ष घनमीटर साठा आहे.



**जिल्ह्यातील जलसाठा**

| प्रकल्प | / टक्केवारी |
|---|---|
| अप्पर वर्धा | ४६.३५ |
| शहानूर | ४०. १८ |
| चंद्रभागा | ७८.९० |
| पूर्णा | ६२.९३ |
| सपन | ४५.२८ |
| पंढरी | २२.१६ |
| लघू प्रकल्प (४८) | ३०.१४ |
| एकूण ५६ , | ४१.३९ |

# अचलपूरात जाळपोळखोरांचा हैदोस

### सहा महिन्यांत दुसरी घटना पोलिसांच्या गस्त व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९अचलपूर**

अचलपूर शहरात अज्ञात समाजकंटकांनी पुन्हा एकदा रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत नागरिकांच्या मालमत्तेला लक्ष्य करत दहशतीचे वातावरण निर्माण केले आहे. बुंदेलपुरा परिसरात एका भाजी विक्रेत्याची दुचाकी घरासमोर उभी असताना पेटवून देण्यात आली. विशेष म्हणजे, याआधी ३१ डिसेंबर रोजी सुलतानपुरा भागात दोन दुचाकी व एक सायकल जाळण्याची घटना घडली होती. अवघ्या सहा महिन्यांत अशाच प्रकारची दुसरी घटना घडल्याने अचलपूर पोलिसांच्या रात्रीच्या गस्त व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. प्राप्त माहितीनुसार, बुंदेलपुरा येथील रहिवासी प्रेमचंद रूपचंद चंदेले (वय ३८) हे भाजीपाला विक्रीचा व्यवसाय करतात. नेहमीप्रमाणे त्यांनी आपली दुचाकी घरासमोर उभी केली होती. मध्यरात्रीनंतर सुमारे दीड वाजताच्या सुमारास अज्ञात व्यक्तीने दुचाकीवर ज्वलनशील पदार्थ टाकून आग लावल्याचा संशय आहे. काही क्षणांतच दुचाकीने पेट घेतला आणि वाहन पूर्णपणे जळून खाक झाले. परिसरातील नागरिकांनी धाव घेत आग विझविण्याचा प्रयत्न केला; मात्र तोपर्यंत मोठे नुकसान झाले होते. घटनेची माहिती मिळताच अचलपूर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असला तरी, शहरात वारंवार घडणाऱ्या अशा घटनांमुळे नागरिकांमध्ये पोलिसांच्या कार्यक्षमतेबाबत नाराजी व्यक्त होत आहे. शहरात रात्री गस्त सुरू असल्याचा दावा केला जात असताना, सलगपणे वाहनांना आग लावण्याच्या घटना घडत



असल्याने गस्त नेमकी कुठे आणि कितपत प्रभावी आहे, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. याआधी ३१ डिसेंबर रोजी सुलतानपुरा भागात बांधकाम व्यवसायिक भगवानदास कोठार यांच्या घराच्या आवारात उभ्या असलेल्या दोन दुचाकी व एका सायकलला पेटवून देण्यात आले होते. त्या घटनेत एक दुचाकी व सायकल पूर्णपणे जळून खाक झाली होती, तर दुसऱ्या दुचाकीचे अर्धवट नुकसान झाले होते. त्या प्रकरणातही पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केल्याचे सांगितले होते. मात्र, अद्याप आरोपींचा शोध लागला नसल्याने समाजकंटकांचे मनोबल वाढल्याची चर्चा शहरात सुरू आहे. सर्वसामान्य नागरिक मेहनतीने कमावलेल्या पैशातून आपली वाहने घेतात. मात्र, रात्रीच्या वेळी अज्ञात विकृत प्रवृत्तीचे लोक नागरिकांच्या मालमत्तेची जाळपोळ करत असतील आणि आरोपी मोकाट फिरत असतील, तर ही परिस्थिती अत्यंत चिंताजनक मानली जात आहे. अशा घटनांमुळे केवळ आर्थिक नुकसान होत नाही, तर नागरिकांच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण होत आहे. अचलपूर शहरात वाढत्या जाळपोळ घटनांवर तातडीने अंकुश आणण्यासाठी पोलिस प्रशासनाने विशेष मोहीम राबवावी, रात्रीची गस्त अधिक कडक करावी, संवेदनशील भागांत सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करावी आणि अशा समाजकंटकांचा तात्काळ बंदोबस्त करावा, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे. अन्यथा उद्या ही जाळपोळ फक्त वाहनांपुरती मर्यादित राहील याची खात्री कोण देणार, असा संतप्त सवालही नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

# चिखलदर्यातल्या कॉफीच्या मूल्यवर्धनासाठी संशोधन, एमगिरी चमूची निरीक्षण

### सकारात्मक परिणामाची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.चिखलदरा**

कॉफी उत्पादनावर कृषी विद्यापीठ, कृषी विज्ञान केंद्र, राज्य शासनाच्या कृषी विभागाद्वारे अभ्यास, संशोधन होणे गरजेचे असताना केंद्र शासनाच्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालयाच्या अखत्यारीत असलेल्या एमगिरीच्या चमूने चिखलदर्याच्या स्फूर्ती क्लस्टर संस्थेने दिलेल्या प्रस्तावावर कॉफी उत्पादन आणि संशोधन प्रकल्पाचे काम सुरू केले आहे. संस्थेचे कार्य निदेशक डॉ. आशुतोष मुरकुटे. डॉ. आदर्शकुमार अग्निहोत्री, डॉ. शितल शर्मा यांचे प्रत्यक्ष निरीक्षण सुरू झाले आहे.

चिखलदर्यात यापूर्वीच ६५ हेक्टर वरती उत्पादीत कॉफीतून सौंदर्यप्रसाधने तयार करण्यात आली असून स्थानिक ६० महिला बचत गटांना सदरील दहा प्रकारच्या सौंदर्यप्रसाधनांचे वाटप प्रायोगिक तत्त्वावर करण्यात आले होते. रोजगार निर्मितीच्या दृष्टीने प्रत्येक महिलेकडून गुगल फॉर्म भरून सौंदर्यप्रसाधनाबाबत सूचना व आवड याबाबत प्रतिक्रिया घेण्यात आल्या आहेत.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी जिल्हाधिकारी अमरावती यांना स्वतंत्ररित्या पत्र व्यवहार करून कॉफी उत्पादन वाढी संदर्भात व त्यातून रोजगार निर्मिती बाबत स्फूर्ती योजनेअंतर्गत प्रकल्पहाती घेण्यात यावा अशा सूचना दिल्या आहेत.

स्थानिक वनविभाग, लोकप्रतिनिधींच्या उदासीनतेमुळे व राजाश्रयाच्या दुर्लक्षतेमुळे महाराष्ट्रात एकमेव चिखलदार येथे उत्पादित होणार्या कॉफीचे उत्पादन वाढ होत नसाल्याची खंत पर्यटक व्यक्त करीत होते.

परंतु, पालकमंत्री तथा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती आणि कृषी विभाग, प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प धारणी , गाविलगड रेंज फॉरेस्ट ऑफिसर व उपविभागीय कार्यालय परतवाडा वनविभाग यांच्याकडे विविध प्रकारचे प्रस्ताव कॉफी उत्पादनात वाढ व्हावी करिता देण्यात आले.

स्थानिकांना रोजगार निर्मिती व्हावी या दृष्टीने जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांचे कार्यालयाद्वारे नाविन्यपूर्ण योजनेतून मधाचे गाव आमझरी गार्डन या ठिकाणी नेचर कॅफे करिता ७७ लक्ष रुपये मंजूर



करण्यात आले आहेत.


यालाच पूरककार्य होणे गरजेचे असल्याने स्फूर्ती क्लस्टर खादी ग्राम उद्योग आयोग यांचे द्वारे महात्मा गांधी ग्रामीण औद्योगीकरण संस्था वर्धा या स्वायत्त्य संस्थेस संचालक स्फूर्ती क्लस्टर यांनी दिलेला प्रस्ताव कॉफी उत्पादन आणि संशोधन मूल्यवर्धन यासाठी स्वीकृत करण्यात आला व त्याकरिताच चिखलदरा कॉफीवरती आरएनडी प्रकल्पास भारत सरकारच्या उरोक्त मंत्रालयाने मंजुरी दिली आहे. देण्यात आली असून विशेष निधी या कार्याकरिता एमगिरी वर्धा संस्थेस हस्तांतरित करण्यात आला आहे.

एमगरी संस्थेच्या वन उत्पादन व मूल्यवर्धन विभागाने चिखलदराच नव्हे तर मध्य प्रदेशातील कुकरू गावाला भेट देऊन तेथील ४४ हेक्टर वरील कॉफी उत्पादनाचे स्रोत समजावून घेतले आहे. चिखलदर्यातील दुर्लक्षित कॉफीचे नमुने प्रकाश होमस्टे आमझरी गार्डन, खटकाली, मयमपूर या ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन संकलीत करण्यात आले आहे.

चिखलदरा कॉफीला जिओ टॅग मिळवून देण्याच्या दृष्टीने कार्य सुरू केले आहे. याबाबतची माहिती प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास सिद्धार्थ शुक्ला यांना देण्यात आली. एमगिरीच्या चमूने स्थानिक शेतकरी, कॉफी विक्रेते यांची भेट घेऊन प्रतिक्रिया जाणून घेतल्या. एमगिरीच्या चमूसोबत स्फूर्ती क्लस्टरचे संचालक सुनील भालेराव होते.

# राष्ट्रवादी काँग्रेसला मोठा धक्का

## परतवाडा शहराध्यक्ष रिंकू शुक्ला यांचा राजीनामा



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९अचलपूर :-** ६राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला परतवाडा शहरात मोठा राजकीय धक्का बसला असून, पक्षाचे शहराध्यक्ष अभिषेक उर्फ रिंकू शुक्ला यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. त्यांच्या राजीनाम्यामुळे पक्षाच्या स्थानिक संघटनात्मक बांधणीवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले आहे. दिनांक २८ मे रोजी जिल्हाध्यक्ष संतोषजी महात्मे यांच्याकडे सादर केलेल्या राजीनामा पत्रात अभिषेक उर्फ रिंकू शुक्ला यांनी पक्षाने आजपर्यंत दिलेल्या जबाबदाऱ्यांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे. पक्षाने विश्वास दाखवून संघटनेत विविध पदांवर काम करण्याची संधी दिली, त्याबद्दल त्यांनी पक्ष नेतृत्वाचे आभार मानले असून, आपला राजीनामा स्वीकारण्यात यावा अशी विनंती केली आहे. शुक्ला हे परतवाडा शहरातील राष्ट्रवादी काँग्रेसचे आक्रमक व सक्रिय चेहरा म्हणून ओळखले जात होते.

अनेक स्थानिक प्रश्नांवर त्यांनी पक्षाची भूमिका ठामपणे मांडली होती. युवकांमध्ये त्यांचा प्रभाव मानला जात असल्याने त्यांच्या राजीनाम्यामुळे पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे. विशेषतः आगामी स्थानिक राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर हा राजीनामा राष्ट्रवादी काँग्रेससाठी धक्कादायक मानला जात आहे.

दरम्यान, त्यांच्या राजीनाम्यामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसले तरी, शहरातील राजकीय वातावरण तापले असून विविध तर्कवितर्कांना उधाण आले आहे. आगामी काळात अभिषेक उर्फ रिंकू शुक्ला कोणती भूमिका घेणार आणि त्यांच्या पुढील राजकीय वाटचालीचा निर्णय काय असेल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# १४२ ग्रामीण पोलिसांच्या प्रशासकीय बदल्या पूर्ण




विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२९अमरावती**

जिल्ह्यातील १४२ पोलिस कर्मचाऱ्यांच्या प्रशासकीय बदल्यांची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. शुक्रवारी (ता. २९) विनंती बदल्यांसाठी पोलिस अधीक्षकांपुढे हजर राहून स्पष्ट कारण द्यावे लागणार आहे. सहायक पोलिस उपनिरीक्षक (एएसआय) ते पोलिस शिपाई दर्जाच्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या केल्या जात आहेत. ज्यांना संबंधित पोलिस ठाणे किंवा साइड ब्रँचला पाच वर्षांचा कालावधी पूर्ण झालेला आहे, त्यांच्या बदल्या या मे च्या शेवटच्या आठवड्यात दरवर्षीच केल्या जातात. अशा १४२ जणांच्या ग्रामीण पोलिस दलातील प्रशासकीय बदल्यांची प्रक्रिया ही बुधवारी (ता. २७) पूर्ण झाली. गुरुवारी (ता. २८) बकरी ईदनिमित्त सुटी असल्याने ग्रामीण पोलिसांच्या विनंती बदल्या या शुक्रवारी (ता. २९) पूर्ण केल्या जातील. ग्रामीण मधील एएसआय ते शिपाई या कर्मचाऱ्यांच्या बदल्यांची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. पोलिस आयुक्तालयातील दहा पोलिस ठाण्यांसह इतर साइड ब्रँचमध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांच्या बदल्यांसंदर्भात प्रक्रिया लवकरच सुरू होईल, असे उपायुक्त (प्रशासन) यांनी सांगितले. कर्मचाऱ्यांचे आजारपण किंवा काही ठोस कारण असेल, अशा कर्मचाऱ्यांना ठाण्यात किंवा साइड ब्रँचला पाच वर्षे पूर्ण व्हायचे असेल तर त्यांना विनंती बदल्यांतर्गत बदलीसाठी अर्ज करण्याची सुविधा आहे.

# रासायनिक खताचा ३० टन निकृष्ट साठा जप्त

### कृषी विभागाच्या पथकाची पापळ येथे कृषी केंद्रावर कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९ नांदगाव खंडेश्वर** तालुक्यातील पापळ येथे एका कृषी केंद्रात बोगस रासायनिक खतांचा साठा करून तो विक्री केल्या जात असल्याची गुप्त माहिती कृषी विभागाला मिळाल्यानंतर धाड घालून रासायनिक खताचा ३० टन निकृष्ट साठा जप्त तसेच कृषी केंद्र संचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.



प्राप्त माहितीनुसार, तालुक्यातील पापळ येथे राधे राधे कृषी सेवा केंद्र असून या केंद्राच्या गोदामामध्ये विनापरवाना निकृष्ट दर्जाचे रासायनिक खताचा साठा करून ठेवल्याची माहिती नांदगाव पंचायत समितीचे कृषी अधिकारी तथा खत निरीक्षक गजानन गिरे यांना मिळाली. त्यांनी पथकासह सदर कृषी केंद्रावर धाड घातली.सदर कृषी केंद्राच्या गोदामाची तपासणी केली असता त्यात विनापरवाना निकृष्ट दर्जाचे रासायनिक खताचा अंदाजे ३० टन साठा आढळून आला. याप्रकरणी कृषी अधिकारी गजानन गिरे यांच्या तक्रारीवरून नांदगाव खंडेश्वर पोलीस ठाण्यात भारत अ‍ॅग्रो एक्सपोर्ट खली, गुजरात, प्राडक्शन मॅनेजर मनमत रामदाम दमाने रा. पुणे, संचालक पवनकुमार गोवर्धन येवतकर रा. पापळ यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

# अंगणवाडीतील अकरा रजिस्टर बंद

## पोषण ट्रॅकरवर माहिती अपडेटचे आदेश; अंगणवाडी सेविकांना मिळाला दिलासा

**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९अमरावती**

महाराष्ट्र शासनाच्या एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालयाने राज्यातील सर्व अंगणवाडी केंद्रांमधील ११ प्रकारचे रजिस्टर पूर्णपणे बंद करण्याचे आदेश दिले आहेत. केंद्रिय महिला व बाल विकास मंत्रालयाच्या निर्देशानुसार ही अंमलबजावणी करण्यात येत आहे. यापुढे सर्व माहिती आता पोषण ट्रॅकर या डिजिटल प्रणालीवर अद्ययावत करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

आयुक्तालयाने जारी केलेल्या पत्रानुसार राज्यातील सर्व जिल्हा कार्यक्रम अधिकारी व बाल विकास प्रकल्प अधिकाऱ्यांना तातडीने रजिस्टर बंद करून त्याची नोंद पोषण ट्रॅकरमध्ये नियमितपणे अपडेट करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच सर्व अंगणवाडी केंद्रांमध्ये दैनंदिन निरीक्षण करून आदेशांची काटेकोर अंमलबजावणी करण्यास सांगण्यातआले आहे.



यापूर्वी अंगणवाडी सेविका व मदतनीस यांचा मोठा वेळ विविध रजिस्टर भरण्यात जात होता. त्यामुळे बालकांचे शिक्षण, पोषण आणि प्राथमिक विकासाकडे अपेक्षित प्रमाणात लक्ष देता येत नसल्याची तक्रार सातत्याने केली जात होती. आता डिजिटल प्रणालीमुळे कागदोपत्री कामाचा ताण कमी होऊन प्रत्यक्ष बालकांवर अधिक लक्ष केंद्रित करता येणार असल्याचे सांगितले जात आहे. दैनिक निरीक्षण, गर्भवती नोंदवही, धात्री माता नोंदवही, ० ते ६ महिने बालक नोंदवही, ६ महिने ते ३ वर्ष बालक नोंदवही, ३ ते ६ वर्ष बालक नोंदवही, वजन काटा नोंदवही, अन्नधान्य वितरण नोंदवही, इतर सर्व कागदी नोंदवही आता बंद करण्यात आली आहे.या निर्णयामुळे अंगणवाडी सेविका व मदतनीसांना मोठा दिलासा मिळणार आहे. अंगणवाडी व्यवस्थापन अधिक डिजिटल आणि प्रभावी होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. अंगणवाडी कर्मचारी संघटनांकडूनही या निर्णयाचे स्वागत केले. रेकॉर्ड लिहिण्यात मोठ्या प्रमाणात वेळ खर्च होत असल्याने बालकांच्या शैक्षणिक व पोषण विकासाकडे पुरेसे लक्ष देता येत नव्हते. आता पोषण ट्रॅकर प्रणालीमुळे कामकाज अधिक सुलभ होणार आहे.

# विधान परीषद निवडणूक रणधुमाळी

## भाजपकडून प्रवीण पोटे फायनल, पण, अर्ज १ जूनला भरणार

### महायुतीच्या जागा वाटपाचा तोडगा न निघाल्याने निर्णय



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९अमरावती**

राज्यातील स्थानिक स्वराज्यसंस्थांच्या १७ विधान परिषद जागांसाठी होत असलेल्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असून, महायुतीमध्ये जागावाटपाचा पेच अद्याप कायम असतानाच भाजपने आपला पहिला उमेदवार जाहीर केला आहे. अमरावती मतदारसंघातून भाजपने प्रवीण पोटे पाटील यांच्यावरच तब्बल तिसऱ्यांदा विश्वास दाखविला आहे. या अनुषंगाने

राज्याचे महसूलमंत्री तथा अमरावतीचे पालकमंत्री बावनकुळे चंद्रशेखर यांच्या उपस्थितीत शुक्रवार २९ जून रोजी दुपारी १:४५ वाजता प्रवीण पोटे पाटील यांचा उमेदवारी अर्ज भरणार होते. मात्र आता त्यांच्या या नियोजित कार्यक्र मात बदल झाला आहे. महायुतीच्या जागा वाटपाचा गुरुवारला रात्रीपर्यंत तोडगा न निघाल्याने आता माजी पालकमंत्री प्रवीण पोटे हे सोमवार १ जून रोजी आपले नामांकन दाखल करणार आहे.

**महायुतीमध्ये जागावाटपाचे' गुऱ्हाळ' सुरूच**

विधान परिषदेच्या १७ जागांसाठी महायुती म्हणून एकत्र लढण्याचा निर्धार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिदे यांनी केला असला, तरी प्रत्यक्षात जागावाटपावरून रस्सीखेच सुरू असल्याचे चित्र आहे. भाजप स्वबळावर १४ मतदारसंघांत बहुमतात असल्याने 'मोठ्या भावाच्या' भूमिकेत आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, भाजपने शिवसेनेला (शिदे गट) ४ जागांची ऑफर दिली आहे, मात्र शिवसेना ६ जागांवर ठाम असल्याने गुरुवारला रात्रीपर्यंत यावर तोडगा निघाला नव्हता.

# दुभाजक की 'डम्पिंग यार्ड'?

## महापालिकेच्या गलथान कारभारामुळे शहराचे सौंदर्यीकरण धुळीस




**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९ अमरावती**


'स्वच्छ अमरावती, सुंदर अमरावती'चा गजर करणाऱ्या अमरावती महानगरपालिकेच्या कारभारावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. शहराच्या प्रमुख मार्गांवरील दुभाजकांची अवस्था पाहता ते सौंदर्यीकरणासाठी आहेत की डम्पिंग यार्डसाठी, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. रेल्वे स्थानक ते मध्यवर्ती बसस्थानक या मार्गावरील दुभाजकांमध्ये मोठ्या प्रमाणावर प्लास्टिक, थर्माकॉल, कागद, दगड-माती, उरलेले अन्नपदार्थ तसेच विविध प्रकारचा टाकाऊ कचरा साचल्याने शहराचे विद्रूपीकरण होत



असल्याचे चित्र समोर आले आहे.महापालिकेने काही वर्षांपूर्वी शहर सुशोभिकरणाच्या उद्देशाने विविध रस्त्यांवरील दुभाजकांमध्ये आकर्षक फेसिंग, शोभेची झाडे आणि हिरवळ विकसित करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र सध्या या दुभाजकांची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून ते अक्षरशः कचरा टाकण्याचे ठिकाण बनले आहेत. विशेष म्हणजे हा सर्व प्रकार प्रशासनाच्या नजरेसमोर सुरू असतानाही स्वच्छता आणि देखभालीकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.रुख्मिणीनगर ते कॉंग्रेसनगर तसेच हमालपुरा ते कॉंग्रेसनगर या उच्चभ्रू वसाहतींमधील प्रमुख मार्गांवरील दुभाजकांमध्येही कचऱ्याचे ढिगारे साचलेले दिसून येत आहेत. रेल्वे स्थानक ते बसस्थानक मार्गावरील दुभाजकांमध्ये तर सर्वाधिक प्लास्टिक, थर्माकॉल आणि इतर टाकाऊ साहित्य आढळून येत असल्याने शहरात येणाऱ्या पाहुण्यांवरही नकारात्मक छाप पडत आहे.या प्रकारावर माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. त्यांनी सांगितले की, रस्ते तयार करताना दुभाजकांचे सुशोभीकरण करण्यात आले होते आणि त्याठिकाणी झाडेही लावण्यात आली होती. मात्र आज तीच ठिकाणे कचरा आणि प्लास्टिक टाकण्याचे केंद्र बनली आहेत. काही व्यापारी खुलेआम कचरा टाकत असून उद्यान विभाग याकडे दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप त्यांनी केला.दरम्यान, जिल्हा प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी दररोज या मार्गांवरून ये-जा करतात. तरीही दुभाजकांमध्ये साचलेला कचरा त्यांच्या नजरेस पडत नाही का, असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत. स्मार्ट सिटीच्या दिशेने वाटचाल करण्याचा दावा करणाऱ्या शहरात मुख्य रस्त्यांवर घाणीचे साम्राज्य पसरले असताना प्रशासन आणि लोकप्रतिनिधी जागे होणार का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# उद्या पंचवटी चौकात सामुदायिक प्रार्थना

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९अमरावती**



ग्रामजयंती पर्वानिमित्त विश्वशांतीकरिता सामुदायिक प्रार्थनेचे आयोजन ३० मे च्या सायंकाळी ६.३० वाजता स्थानिक पंचवटी चौक येथील डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या स्मारकाजवळ करण्यात आले आहे. या सामुदायिक प्रार्थनेमध्ये ७० च्या वर सामाजिक संस्था, गुरुदेव सेवा मंडळनागरिकांना सहभागी होण्याचे आवाहनसहभागी होणार आहे. सायंकाळी ६ वाजता प्रार्थना स्थळी नोंदणी होईल. त्यानंतर खंजिरी भजन, सामाजिक राष्ट्रवंदना व समारोप होईल. प्रार्थनेतील स्वरूप हे आज समाजात जात, धर्म, पंथ, भाषा, सामुदायिक व भाषण तसेच प्रांत आणि विचार यांच्या नावावर भिंती निर्माण होत आहेत. माणूस माणसापासून दूर जात आहे. अशा परिस्थितीत सामुदायिक प्रार्थना समाजाला एकत्र आणण्याचे कार्य करीत असून या भव्य सामुदायिक प्रार्थनमध्ये नागरिकांनी, गुरुदेव भक्तांनी, सामाजिक संस्थांनी सहभागी होण्याचे आवाहन सेवा सामर्थ्य बहुउद्देशीय संस्था अंतर्गत युगप्रभात फाउंडेशनच्या फाउंडेश वतीने करण्यात आले आहे.-

# महिनाभरात पाणीटंचाईग्रस्त गावांमध्ये ३८ गावांची वाढ

## ८४ गावांमध्ये ३२ बोअरवेल, ६१ खासगी विहिरी अधिग्रहित

## चिखलदऱ्यात ९ गावात २१ टँकरद्वारे पाणीपुरवठा



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९अमरावती**

उन्हाळ्याची तीव्रता वाढत असताना जिल्ह्यात पाणीटंचाईचे संकट अधिक गंभीर होत आहे. एप्रिलमध्ये ४६ गावांमध्ये ५३ प्रकारच्या उपाययोजना सुरू असताना मेमध्ये त्यात वाढ झाली आहे. ८४ गावांमध्ये ९३ उपाययोजना सुरू आहेत. त्यानंतरही महिनाभरात तब्बल ३८ गावांची टंचाईग्रस्त गावांत वाढ झाली आहे. चिखलदरा तालुक्यात ९ गावात २१ टँकरद्वारे पाणी पुरवठा सुरू आहे.जिल्ह्यातील दर्यापूर आणि चांदूरबाजार तालुका वगळाता अन्य १२ तालुक्यांमधील तब्बल ८४ गावांमध्ये पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी प्रशासनाला ३२ बोअरवेल आणि ६१ खासगी सिंचन विहिरी अधिग्रहित कराव्या लागल्या आहेत. पाणीटंचाईचा सर्वाधिक फटका चिखलदरा आणि धारणी तालुक्यात दिसून येत असून, डोंगराळ आणि दुर्गम भागांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. चिखलदरा तालुक्यातील १७ गावांमध्ये १३ बोअरवेल व ४ खासगी विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे. तर धारणी तालुक्यातही अनेक गावांमध्ये पर्यायी जलस्रोतांवर अवलंबून राहावे लागत आहे. मोर्शी तालुक्यात १३, वरुडमध्ये १२, नांदगाव खंडेश्वरमध्ये १२ आणि चांदूररेल्वेमध्ये ६ गावांमध्ये पाणीटंचाईची स्थिती गंभीर असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

पावसाळा अवघ्या काही आठवड्यांवर येऊन ठेपला असला तरी सध्या ग्रामीण भागातील पाणीटंचाई स्थिती चिंताजनक असल्याचे चित्र आहे. त्यामुळे प्रशासनासमोर पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्याचे मोठे आव्हान निर्माण झाले आहे.

**चिखलदऱ्यात टँकरवर अवलंबून गावे्**

चिखलदा तालुक्यातील ९ गावांमध्ये २१ खासगी टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. मोथा, खडीमल, गोलखेडा बाजार, बहादरपूर, आकी, मेहरीयम, आलाडोह, लवादा आणि गवळीढाणा (कोरडा) या गावांमध्ये एकूण सुमारे ६ हजारांहून अधिक लोकसंख्या टँकरच्या पाण्यावर अवलंबून आहे. खडीमल, मेहरीयम आणि गवळीढाणा या गावांमध्येही प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांची कामे प्रगतीपथावर असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. काही गावांमध्ये ५९ ते ७२ टक्क्यापर्यंत कामे पूर्ण झाली असली तरी नागरिकांना अद्याप नियमित पाणीपुरवठ्यांसाठी प्रतीक्षा करावी लागत आहे.

# परतवाड्यात शिवतीर्थावर सावरकर जयंतीनिमित्त सामूहिक प्रतिमा पूजन



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९अचलपूर**

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून 'वीर सावरकर मिशन, अचलपूर' तर्फे गुरुवार, २८ मे २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता जयस्तंभ चौकातील ऐतिहासिक शिवतीर्थ परिसरात सामूहिक प्रतिमा पूजन कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी उपस्थितांना संबोधित करताना अचलपूर विधानसभा क्षेत्राचे आमदार प्रवीण तायडे यांनी अचलपूर शहरात लवकरच भव्य 'सावरकर स्मारक' उभारण्याचे महत्त्वपूर्ण वचन दिले. कार्यक्रमाची सुरुवात जयस्तंभ चौकातील शिवतीर्थावर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे पूजन आणि स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. उपस्थित सर्व सावरकरप्रेमी, नागरिक आणि कार्यकर्त्यांनी अत्यंत उत्साहात आणि शिस्तबद्ध पद्धतीने सामूहिक पूजन करून दोन्ही राष्ट्रपुरुषांच्या स्मृतींना वंदना दिली. यावेळी मुख्य उपस्थिती म्हणून बोलताना आमदार प्रवीण तायडे म्हणाले की, स्वातंत्र्यवीर सावरकरांचे जीवन आणि प्रखर राष्ट्रवादाची विचारधारा ही आजच्या तरुण पिढीसाठी आणि राष्ट्राच्या सुरक्षिततेसाठी अत्यंत आवश्यक आहे. सावरकरांच्या त्यागाची स्मृती अचलपूर परिसरात चिरंतन राहावी, यासाठी शहरात लवकरच एक सुंदर सावरकर स्मारक उभारण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी याप्रसंगी दिली.यावेळी आ. प्रवीण तायडे यांनीआपले विचार मांडले. स्वातंत्र्यलढ्यात आणि स्वातंत्र्यानंतरही सावरकरांसारख्या महान देशभक्ताला कसे उपेक्षित ठेवले गेले, याबद्दल त्यांनी खंत व्यक्त करत सावरकरांचे खरे विचार

### अचलपूरात लवकरच 'सावरकर स्मारक' उभारणार - आमदार प्रवीण तायडे

जनमानसापर्यंत पोहोचवण्याची गरज प्रतिपादित केली.या सोहळ्याला वीर सावरकर मिशनचे अध्यक्ष प्रा. गंधार कुलकर्णी, सचिव डॉ. सौ. जयश्री कुलकर्णी, कोषाध्यक्ष विश्राम कुलकर्णी, सहसचिव डॉ. योगिनी सोनटक्के, सौ. रेणुका मुळे, एड. माधुरी भवाळकर, आनंद भटूरकर आणि कु. तनुजा चापके प्रामुख्याने उपस्थित होते. तसेच भाजप पदाधिकारी डॉ. वनश्री देशपांडे, रूपेश ढेपे, कुंदन यादव, सौ. नयना जोशी, डॉ. अनंत भारतीय, डॉ. सारिका श्रावणे, विवेक श्रावणे, मुकुंद भारतीय, कु. सिद्धिका आखरे, संदीप चापोरकर, मनोज पसारकर, . कौस्तुभ मुंदे यांच्यासह अचलपूर-परतवाडा शहरातील विविध सामाजिक, सांस्कृतिक संस्थांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, शिक्षक, वकील, पत्रकार आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# तिवसा येथे कॉंग्रेसचे महागाईविरोधात आंदोलन

## मेलोडी चॉकलेट वाटून केंद्र सरकारचा निषेध..




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९तिवसा,** पेट्रोल, डिझेल, एलपीजी गॅस सिलेंडर तसेच रासायनिक खतांच्या वाढत्या दरवाढीच्या निषेधार्थ तिवसा तालुका कॉंग्रेस कमिटीच्या वतीने आज तहसील कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्यात आले. यावेळी तहसीलदारांमार्फत शासनाला निवेदन सादर करण्यात आले.केंद्र सरकारच्या महागाईविरोधी धोरणांवर टीका करत कार्यकर्त्यांनी महागाईने जनता त्रस्त, सरकार मात्र मस्त अशा घोषणा दिल्या. विशेष म्हणजे तिवसा येथील गॅस एजन्सीसमोर रांगेत उभ्या नागरिकांना प्रतीकात्मक स्वरूपात मेलोडी चॉकलेट वाटप करून उपरोधिक आंदोलन करण्यात आले.पेट्रोल, डिझेल व गॅसच्या दरात तात्काळ कपात करावी, खतांच्या वाढलेल्या किमती नियंत्रणात आणाव्यात तसेच शेतकऱ्यांना बॅरेलमध्ये डिझेल उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.सदर आंदोलनात शेकडो कार्यकर्ते, शेतकरी व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# गॅसयुक्त विहिरीत पडलेल्या युवकाची अग्निशमन दलाकडून सुखरूप सुटका

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९अमरावती**

विद्यापीठ परिसरातील गॅसयुक्त विहिरीत पडलेल्या २५ वर्षीय युवकाला अग्निशमन दलाने धाडसी बचावकार्य करत सुखरूप बाहेर काढल्याची घटना शुक्रवारी सकाळी घडली. युवराज निलेश परतानी असे बचाव करण्यात आलेल्या युवकाचे नाव आहे.अग्निशमन मुख्यालयाला सकाळी सुमारे १०.५० वाजता एका व्यक्ती गॅस असलेल्या विहिरीत पडल्याची माहिती मिळाली. माहिती



मिळताच अग्निशमन केंद्र प्रमुख श्री. सोनकांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली बचाव पथक तातडीने घटनास्थळी रवाना झाले. फायरमन हर्षद दहातोंडे, निलेश काटपेलवार, प्रणित पेठे तसेच वाहन चालक मो. फरहान यांनी या मोहिमेत सहभाग घेतला.वाहन चालक मो. फरहान यांनी अत्यंत वेगाने आणि सुरक्षितपणे वाहन चालवत अवघ्या सहा मिनिटांत घटनास्थळी पोहोचून तत्परतेचे उदाहरण घालून दिले. त्यानंतर अग्निशमन दलाच्या जवानांनी रोप शिडीच्या साहाय्याने गॅसयुक्त विहिरीत उतरून युवराज परतानी याला सुरक्षितपणे बाहेर काढले.या धाडसी बचावकार्यानंतर उपस्थित नागरिकांनी अग्निशमन दलाच्या कार्याचे कौतुक केले. संकटाच्या प्रसंगी जीव धोक्यात घालून नागरिकांचे प्राण वाचविणाऱ्या अग्निशमन दलामुळे एक अमूल्य जीव वाचला असून शहरभरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.